# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

❖ **यंदाही पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नियोजन सुरू**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने यंदा देखील पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला असून नवीन वर्षाच्या सुरुवातीपासूनच त्याचे नियोजन करण्यात येत आहे. येत्या १६ जानेवारी २०२५ रोजी आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृहात सायंकाळी ०५.३० वाजता गणेशोत्सव २०२५ चे नियोजन करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर बैठकीत जनसहभागातून जनकल्याणकारी उपक्रम राबवण्यावर भर दिला जाणार असून पर्यावरणपूरक गणेशोत्सवासंबंधीच्या उपक्रमांवर चर्चा करण्यात येणार आहे.

मिरा भाईंदर शहरातील पायाभूत सोयीसुविधांचा विकास करताना पर्यावरणाचे संवर्धन करण्यावर मिरा भाईंदर महानगरपालिका सातत्याने भर देत असते. गणेशोत्सव काळातील प्रदूषण टाळून उत्सव अधिक पर्यावरणस्नेही करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. गणेशोत्सव २०२५ पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी जनतेला सहभागी करून घेतले जाणार आहे. याचे नियोजन करण्यासाठी ही बैठक आयोजित केली आहे.

मिरा भाईंदर शहराच्या पश्चिमेकडे समुद्रकिनारा असून, शहरात १७ हून अधिक नैसर्गिक तलाव आहे. गणेशोत्सव काळात समुद्र आणि तलावातील प्रदूषण तसेच नैसर्गिक संपदेचा ऱ्हास टाळण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. शहरात अधिकाअधिक कृत्रिम तलाव उभारले जाणार आहेत. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना असलेल्या बंदीची प्रभावी अंमलवाजणी केली जाणार असून, मूर्तीकारांना पर्यावरणस्नेही मूर्ती बनविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी ऑगस्ट 2025 मध्ये होणा-या गणेशोत्सवाकरीता माती आणि जागा उपलब्ध करून दिले जाणार आहे. तसेच त्यांच्या विक्रीसाठी सहाय्य केले जाणार आहे, मंडप उभारणीत सवलत दिली जाणार आहे. नागरिकांनी अधिकाअधिक शाडू मातीच्या मूर्तीचा वापर करावा, सजावटीचे साहित्य पर्यावरणपूरक आणि नैसर्गिक रंगाचा वापर करावा, ध्वनी प्रदूषण टाळावे यासाठी जनजागृतीपर उपक्रम राबविले जाणार आहेत. तसेच भावी पिढीमध्ये पर्यावरणाचे महत्त्व रुजावे यासाठी आंतरशालेय स्पर्धाही घेण्यात येणार आहेत. या उपक्रमांवर आणि इतर नियोजनात्मक बाबींवर नियोजन बैठकीत चर्चा होणार आहे. यंदाचा गणेशोत्सव अधिक पर्यावरणस्नेही आणि मंगलमय वातावरणात पार पाडण्यासाठी, प्रतिबंधात्मक उपाययोजना करणार, नागरिकांच्या सहभागाने जनजागृतीपर उपक्रम राबविणार आणि नियमांचे उल्लंघन करून, पर्यावरणास हानी पोहोचवल्यास कारवाई करण्यात येईल असे मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) यांनी सांगितले आहे.